NHNSC

(1)

ग्रामस्तरावरील "ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता" व "ग्राम आरोग्य समिती" यांचे विलिनीकरण करून या विषयांसाठी ग्रामस्तरावर "ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती" अशी एकच समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु. १००६/प्र. क्र. ३६४/ पापु-०७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर २००६

पहा.—(१) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्र. ग्रापापु.१०९१/सीआर २६७/३१-ज, दिनांक १०.०९.१९९१

(२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु.१०९६/प्र.क्र.१२८०/पापु-०७, दिनांक २८.११.१९९६

(३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रं. संकीर्ण २०००/ प्र.क्र.२६१/कु.क.३, दिनांक १०.११.२०००

(४) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु.१००१/प्र.क्र.११०/ पापु-०७, दिनांक ३.१.२००१

(५) दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रसिद्ध केलेला सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३

(६) शासन परिपत्रक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु.१००५/प्र.क्र.७४ (२)/ पापु-०७, दिनांक २.५.२००५

प्रस्तावना :

गावातील पाणीपुरवठा योजनांच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम पाहण्यासाठी व पाणी गुणवत्ता नियंत्रणासाठी ग्रामस्तरावर ग्राम पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता समिती गठित करण्याबाबत सूचना संदर्भाधिन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये उक्त शासन निर्णयात देण्यात आली आहेत.

२. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी सन २००० मध्ये मागणी आधारित समूह सहभागाचे सुधारित धोरण जाहीर केल्यानंतर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयात दिलेल्या सूचनांन्वये पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी ग्रामस्तरावरून करण्यासाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये त्यात नमूद करण्यात आलेली आहेत.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारित कलम ४९ मध्ये अंतर्भूत करून ग्रामस्तरावर गठित होणाऱ्या ग्रामविकास समित्यांना वैधानिक दर्जा देण्यात आला असून ग्रामस्तरावरील विविध विकास कामांसाठी ग्रामविकास समित्या गठित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

४. केंद्र शासनाने सन २००५ पासून सुरू केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (National Rural Health Mission) (NRHM) कार्यक्रमांतर्गत बालमृत्यू दर, माता मृत्यू दर व जनन दर कमी करणे, लसीकरण, कुपोषण व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक बालविकास प्रकल्प व इतर कुटुंब कल्याणविषयक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

५. ग्रामीण जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे, कुपोषण व आरोग्यविषयक कार्यक्रम हे एकमेकांशी निगडीत असल्याने ग्रामस्तरावरून त्यांची अंमलबजावणी करताना या विविध कार्यक्रमांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याने या कामांसाठी ग्रामस्तरावर वेगवेगळ्या समित्या गठित न करता हे काम ग्रामस्तरावरील एकाच समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याने ग्रामस्तरावरील ग्राम आरोग्य समितीचे विलिनीकरण ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करून या समितीचे नामाभिधान "ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती" असे करण्याची व ग्रामीण पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व पोषण हे विषय या समितीच्या अखत्यारित आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



109

शासन निर्णय :—

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून ग्रामस्तरावरून राबविण्यात येणारा पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कार्यक्रम, आरोग्यविषयक कार्यक्रम तसेच, महिला व बालविकास कार्यक्रम ग्रामस्तरावरील एकाच समितीमार्फत राबविण्यासाठी ग्रामस्तरावरील ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम आरोग्य समिती यांचे विलिनीकरण करून, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ अन्वये "ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती" अशी एकच समिती गठित करण्यास व या समितीमार्फत पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कार्यक्रम, आरोग्यविषयक कार्यक्रम तसेच महिला व बालविकास कार्यक्रम राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. "ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची" रचना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ नुसार राहील (प्रत सोबत परिशिष्ट १ मध्ये जोडली आहे) तर, या समितीची कार्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार राहतील.

३. वरीलप्रमाणे "ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती" गठित करण्यात आल्यावर या समितीचे सध्या असलेले बँक खाते फक्त पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी वापरात ठेवावे ; तर आरोग्य, महिला व बालविकास कार्यक्रमासाठी स्वतंत्र बचत बँक खाते उघडण्यात यावे. हे स्वतंत्र बचत बँक खाते समितीचे अध्यक्ष व गावातील अंगणवाडी सेविका या दोघांच्या संयुक्त सहीने चालविण्यात यावे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत व आरोग्य तसेच पोषण कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणारा निधी या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्यात यावा. या खात्यामधील जमाखर्चाची नोंद आशा / अंगणवाडी सेविका यांनी स्वतंत्र नोंदवहीद्वारे ठेवावी. जमाखर्चाची ही नोंदवही वेळोवेळी एएनएम/एमपीडब्ल्यू/ग्रामपंचायतीने तपासावी व सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध ठेवावी. या निधीचा विनियोग करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या/येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१२०६१९३३२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. शं. धुमाळ,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. सदस्य, महाराष्ट्र विधानसभा / महाराष्ट्र विधानपरिषद (सर्व)
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)